आशिया कप स्पर्धा यूएईच्या मैदानात खेळवण्याचा विचार

टीम इंडियासंदर्भात बीसीसीआय काय निर्णय घेणार?

मुंबई । वृत्तसंस्था

भारत-पाकिस्तान यांच्यातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे आशिया कप २०२५ स्पर्धा होणार की नाही, असा प्रश्न गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. यासंदर्भात आता नवी माहिती समोर येत आहे. आशियाई क्रिकेट परिषदेकडून ही स्पर्धा युएईमध्ये खेळवण्याचा विचार सुरु आहे. सप्टेंबरमध्ये टी-२० प्रकारात या स्पर्धेचे आयोजन करण्याबाबत विचार सुरु असल्याचेही समजते. यंदाच्या हंगामातील आशिया कप स्पर्धेसंदर्भात सकारात्मक गोष्ट समोर येत असली तरी टीम इंडियाच्या या स्पर्धेतील सहभागाबद्दल अनिश्चितता कायम असल्याचेही दिसून येते.

एका वृत्तानुसार जर सर्वकाही ठिक झाले तर आशिया कप २०२५ स्पर्धा ही युएईच्या मैदानात खेळवली जाऊ शकते. यंदाच्या हंगामातील आशिया कप स्पर्धेचे यजमानपद हे भारताकडे आहे. पण पाकिस्तान संघामुळे ही स्पर्धा युएईच्या मैदानात खेळवण्याचा विचार केला जाऊ शकतो. सध्याच्या घडीला पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसीन नक्वी हेच आशिया क्रिकेट परिषदेचे प्रमुख आहेत. त्यांच्यासह आशियाई क्रिकेट परिषदेच्या अधिकाऱ्यांना भारतीय संघ या स्पर्धेत खेळेल, अशी आशा आहे. पण बीसीसीआयने मात्र यावर अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही.

टी-२० प्रकारात होणार स्पर्धा?

आशिया कप स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या आठ संघांमध्ये भारत, पाकिस्तान, श्रीलंका, अफगाणिस्तान, बांगलादेश, युएई, ओमन आणि हाँगकाँग या संघांचा समावेश आहे. ही स्पर्धा सप्टेंबरमध्ये होणे अपेक्षित आहे. गत हंगामातील आशिया कप स्पर्धेचे यजमानपद हे पाकिस्तानने भुषवले होते. २०२३ मध्ये पार पडलेल्या स्पर्धे वेळी भारतीय संघासाठी निम्मे सामने हे श्रीलंकेत खेळवण्यात आले होते. २०२३ च्या वनडे वर्ल्ड कपच्या पार्श्वभूमीवर त्यावेळी ही स्पर्धा वनडे प्रकारात खेळवण्यात आली. आता २०२६ च्या टी २० वर्ल्ड कपचा विचार करताना यंदाच्या हंगामातील आशिया कप स्पर्धात टी-२० प्रकारात खेळवण्यात येणार आहे.

कर्णधार न होण्याचा निर्णय माझा होता!

बीसीसीआयने दिली होती ऑफर : बुमराहने केला खुलासा

मुंबई । वृत्तसंस्था

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२७ स्पर्धेची सुरुवात भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यापासून करणार आहे. पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेपासून भारतीय संघ सुरुवात करणार आहे. ही मालिका सर्वार्थाने टीम इंडियासाठी खूपच महत्त्वाची आहे. या मालिकेत रोहित शर्मा आणि विराट कोहलीची उणीव भासणार आहे. तर जसप्रीत बुमराहच्या खांद्यावर मोठी जबाबदारी असणार आहे. कर्णधार शुबमन गिलला जसप्रीत बुमराहकडून फार अपेक्षा असतील यात काही शंका नाही. पण त्याची दुखापत पाहता वर्क लोड मॅनेजमेंट करणं खूपच महत्त्वाचे ठरणार आहे. असे असताना वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने मोठा खुलासा केला आहे. बुमराहच्या खांद्यावर कसोटी संघाची धुरा का सोपवली नाही याबाबत त्याने सत्य समोर आणले आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या निवृत्तीनंतर बीसीसीआयने कर्णधारपदासाठी जसप्रीत बुमराहचा विचार केला होता. पण जसप्रीत बुमराहने ही जबाबदारी घेण्यास नकार दिला आहे. कारण त्याने फिटनेस आणि टीमला प्राधान्य देणं महत्त्वाचे समजले.

जसप्रीत बुमराहने दिलेल्या एका मुलाखतीत सांगितले की, रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी निवृत्ती घेण्यापूर्वी आयपीएल दरम्यान माझ्यासोबत बीसीसीआयने चर्चा केली होती. मी पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी वर्कलोड मॅनेजमेंटबाबत सांगितले. तसेच माझ्या पाठीची काळजी घेणाऱ्या तज्ज्ञांशी चर्चा केली. त्यानंतर असा निष्कर्ष काढला की मला थोडं अधिक स्मार्ट व्हावे लागेल. त्यानंतर मी बीसीसीआयला फोन केला आणि सांगितले की मी कर्णधारपदासाठी तयार नाही. कारण मी सर्व कसोटी सामने खेळू शकणार नाही. बीसीसीआय मला कर्णधार म्हणून पाहात होती. पण मी त्यांना नकार दिला कारण कोणी कर्णधारपद भूषवत असेल तर असे वागणे योग्य ठरणार नाही. तीन कसोटी सामन्यात नेतृत्व करायचे आणि नंतर दुसऱ्याकडे सोपवायचे हे काही योग्य नाही. हे संघासाठी चांगले नाही. संघाचे हित लक्षात घेणे गरजेचे होते.

जसप्रीत बुमराह हा पाठीच्या दुखापतीमुळे त्रस्त आहे. २०२२ ते २०२३ या वर्षात क्रिकेट मैदानापासून दूर होता. त्यानंतर जोरदार कमबॅक केले. टी-२० वर्ल्डकप २०२४ स्पर्धेत चांगली कामगिरी केली. पण ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेत त्याच्या दुखापतीने पुन्हा डोकं वर काढले. त्यामुळे शेवटच्या सामन्यात मध्यातच सामना सोडून जावे लागले. इतकंच काय तर चॅम्पियन्स ट्रॉफीतही खेळू शकला नाही. अशात भविष्याच्या दृष्टीकोनातून बुमराह जोखिम घेऊ इच्छित नाही. तसेच संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावू इच्छित आहे.

इंग्लंडचे खेळाडू शुभमनला लक्ष्य करतील -निक नाईट

लंडन । वृत्तसंस्था

२० जूनपासून सुरु होणाऱ्या भारत विरुद्ध इंग्लंड कसोटी मालिकेत शुभमन गिलकडून केवळ कर्णधार म्हणूनच नव्हे तर फलंदाज म्हणूनही उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा आहे. मायदेशात म्हणजेच भारतात शुभमनची कामगिरी जरी उत्तम असली तरी, परदेशात त्याची कामगिरी फारशी चांगली राहिलेली नाही. यादरम्यान, गिलकडून २००७ नंतर इंग्लंडमध्ये भारताला पहिला मालिका विजय मिळवून देण्याची अपेक्षा आहे.

इंग्लंडचा माजी फलंदाज निक नाईट म्हणाला की बेन स्टोक्सचे खेळाडू विशेषतः शुभमन गिलला लक्ष्य करतील. ही मालिका खूप कठीण आणि आव्हानाने भरलेली मालिका असेल. इंग्लंड नवख्या आणि तरुण कर्णधार शुभमन गिलला लक्ष करेल आणि त्याचा विरुद्ध संघाला फायदा होईल असे दिग्गज खेळाडूने म्हटले. जेव्हा एखादा कर्णधार दबाव आणि असुरक्षित वाटून घेतो तेव्हा त्याला लक्ष करणे सोपे असते आणि त्याचा परिणाम ड्रेसिंग रूममध्ये देखील होतो. इंग्लंडचे खेळाडू शुभमनला लक्ष करतील आणि त्याला अस्वस्थ करण्याचा प्रयत्न करतील. शुभमनला टार्गेट केल्याचा परिणाम त्याचा आजूबाजूच्या खेळाडूंवर देखील होईल असे नाईट म्हणाला.

टीम इंडियाचा कॅप्टन अडचणीत, इंग्लंडमध्ये शस्त्रक्रिया होणार!

लंडन । वृत्तसंस्था

टीम इंडियाच्या शुबमन पर्वाला इंग्लंड दौऱ्यातून सुरुवात होणार आहे. टीम इंडिया शुबमन गिल याच्या नेतृत्वात इंग्लंड विरुद्ध ५ कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. या मालिकेला २० जूनपासून सुरुवात होत आहे. टीम इंडियाची या सलामीच्या सामन्यासाठी तयारी झाली आहे. टीम इंडिया जुलै महिन्यात बांगलादेश दौरा करणार आहे. टीम इंडियाला या दौऱ्यात ३ वनडे आणि ३ टी-२० सामन्यांची मालिका खेळायची आहे. मात्र त्याआधी टीम इंडियाच्या गोटातून मोठी बातमी समोर आली आहे. टीम इंडियाच्या कर्णधारावर इंग्लंडमध्ये शस्त्रक्रिया होणार आहे.

इंग्लंडमध्ये होणार शस्त्रक्रिया

टी-२० टीम इंडियाचा कॅप्टन सूर्यकुमार यादव याच्याबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. सूर्या स्पोर्ट्स हर्नियाने त्रस्त आहे. या स्पोर्ट्स हर्नियावर उपचारासाठी सूर्या लंडनमध्ये आहे.

सूर्याला यामुळे बांगलादेश विरूद्धच्या टी-२० मालिकेला मुकावे लागू शकते. सूर्यावर शस्त्रक्रिया पार पडल्यानंतर त्याला कमबॅक करण्यासाठी किमान २ महिन्यांचा वेळ लागू शकतो. त्यामुळे टीम इंडियाचे टेन्शन वाढले आहे. दरम्यान सूर्यावर याआधी अनेक शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. तसेच सूर्याला दुखापतीचा सामना करावा लागला आहे. सूर्याला गेल्या वर्षी दक्षिण आफ्रिका दौऱ्याआधी घोट्याला दुखापत झाली होती.

कसोटीच्या पहिल्याच दिवशी बांगलादेश श्रीलंकेवर पडला भारी

गॅले । वृत्तसंस्था

श्रीलंका आणि बांगलादेश या दोन क्रिकेटमध्ये मागच्या काही वर्षात द्वंद्व पाहायला मिळाले आहे. बांगलादेश संघ श्रीलंकेसाठी कायम डोकेदुखी ठरला आहे. त्यात वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२७ स्पर्धेची सुरुवात या मालिकेपासून झाली आहे. पहिला कसोटी सामना श्रीलंकेतील गॅले येथे सुरु आहे. या सामन्यात नाणेफेकीचा कौल बांगलादेशच्या बाजूने लागला आणि प्रथम फलंदाजी निवडली. बांगलादेशची सुरुवात एकदम ढिसाळ झाली. आघाडीचे तीन फलंदाज स्वस्तात बाद झाले. अवघ्या ४५ धावांवर तीन खेळाडू तंबूत होते. त्यामुळे बांग्लादेश संघावर दडपण वाढले होते. पण त्यानंतर बांगलादेश संघ श्रीलंकेवर भारी पडला.

पहिल्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा ९० षटकं खेळत बांगलादेशने ३ गडी गमवून २९२ धावा केल्या होत्या. त्यामुळे पहिल्या दिवसावर बांगलादेशने मजबूत पकड मिळवली असे म्हणायला हरकत नाही. कर्णधार नजमुल होस्सेन शांतोन २६० चेंडूत १४ चौकार आणि १ षटकार मारत नाबाद १३६ धावा केल्या आहेत. तर मुश्तफिकुर रहिमने १८६ चेंडूंचा सामना करत ५ चौकार मारत नाबाद १०५ धावा केल्या आहेत.

बांगलादेशला पहिला धक्का अनामुल हकच्या रुपाने बसला. त्याला आपले खातेही खोलता आले नाही. तर शदमन इस्लाम १४ धावांवर असताना तंबूत बाद झाला.

१३ सिक्सर, ४८ बॉलमध्ये शतक; मॅक्सवेलची तुफानी खेळी

मुंबई । वृत्तसंस्था

ऑस्ट्रेलियाचा ऑलराउंडर ग्लेन मॅक्सवेल याने अनेकदा तोडफोड बॅटिंगच्या जोरावर टीमला एकहाती विजय मिळवून दिला आहे. मॅक्सवेल याने अनेकदा निर्णायक क्षणी स्फोटक बॅटिंग करुन ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून दिलाय. मॅक्सवेलने अवघ्या काही दिवसांपूर्वी एकदिवसीय क्रिकेटला रामराम केला. मॅक्सवेलने २ जून रोजी एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती.

मॅक्सवेल याने एमएलसी अर्थात मेजर लीग क्रिकेट २०२५ स्पर्धेत वॉशिंग्टन फ्रीडमकडून खेळताना लॉस एंजेलिस नाईट रायडर्स विरुद्ध झंझावाती शतक ठोकलंय. मॅक्सवेलने एमएलसी २०२५ स्पर्धेतील ८ व्या सामन्यात अवघ्या ४८ बॉलमध्ये १२ सिक्स आणि २ फोरसह हे शतक पूर्ण केले. मॅक्सवेलच्या टी २० कारकीर्दीतील हे आठवं शतक ठरलं. विशेष म्हणजे मॅक्सवेलने सहाव्या स्थानी बॅटिंग करताना हा कारनामा केला आहे. तसेच मॅक्सवेलने या संपूर्ण खेळीत एकूण १३ षटकार लगावले.

मॅक्सवेलने या सामन्यात ४९ चेंडूत नाबाद १०६ धावांची नाबाद खेळी केली. मॅक्सवेलने २१६.३२ च्या स्ट्राईक रेटने ही खेळी केली. मॅक्सवेलने या खेळीत १३ षटकार लगावले. मॅक्सवेलने केलेल्या या खेळीमुळे वॉशिंग्टन फ्रीडमने ५ विकेट्स गमावून २०८ धावा केल्या.

इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत टीम इंडियाचे पारडे जड!

मुंबई । वृत्तसंस्था

भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच सामन्यांची कसोटी मालिका २० जूनपासून सुरु होणार आहे. पहिलाच सामना लीड्सवर खेळवला जाणार आहे. सामना इंग्लंडमध्ये होत असला तरी मालिकेत भारतीय संघाचे पारडे जड मानले जात आहे.

भारताने २००७ नंतर इंग्लंडमध्ये कसोटी मालिका जिंकलेली नाही. त्यामुळे या मालिकेत इंग्लंडचे पारडं जड मानले जात आहे. पण चित्र अगदी त्याच्या उलट आहे. कारण एक आकडा पाहिला तर या मालिकेत इंग्लंडची धाकधूक वाढली आहे. इंग्लंड संघ मायदेशी खेळत असला तर भारताचे पारडं जड आहे.

इंग्लंड संघाची धुरा जेव्हापासून बेन स्टोक्सच्या हाती सोपवली गेली. तेव्हापासून संघ आक्रमक खेळी करत आहे. पण हीच आक्रमकता इंग्लंड संघाच्या अंगलट आली आहे. मागच्या पाच वर्षात इंग्लंड संघाने घराच्या मैदानावर ११ कसोटी मालिका खेळल्या आहेत. यात फक्त एक कसोटी गमावली आहे. पण असे असूनही त्यांची कामगिरी निराशाजनक राहिली आहे.

मागच्या पाच वर्षातील आकडेवारी पाहून इंग्लंडची धाकधूक वाढली आहे. इंग्लंडने लीड्स कसोटीसाठी हिरव्या गवताळ विकेटऐवजी पाटा विकेटची मागणी केली आहे. त्यामुळे इंग्लंड संघाला फलंदाजी करणे सोपे होईल.

विधीलिखित

सुरेशराव बोरकर,
ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय,
रावेर. मो. : ९८५००१५५५८

गुरुवार, दि. १९ मार्च २०२५

--* दैनंदिन राशिभविष्य *-*-*

मेष – अधिक खर्च करावा लागेल.
वृषभ – वाहनावर खर्च करावा लागेल.
मिथुन – नविन वाहन खरेदीचे योग आहेत.
कर्क – लेखनात अनेक चुका होतील.
सिंह – वास्तु खरेदी कराल.
कन्या – संसारात कायद्याचे प्रश्न निर्माण होतील.
तूळ – वकील मंडळींना अति उत्तम दिवस.
वृश्चिक – सरकारी बहुमान प्राप्त कराल.
धनू – महिलांना अडचणीचा दिवस राहील.
मकर – सरकारी कामात यश मिळवाल.
कुंभ – सरकारी कामासाठी खर्च कराल.
मीन – हरभऱ्याची उसळ आज खावी.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करुन देशदूत कार्यालय, ई-७/९, व.वा.मार्केट (गोलाणी मार्केट) दुसरा मजला, नवी पेठ जळगाव येथे प्रसिध्द केले. ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४, नंदुरबार २२११०१. **RNI.No. 68337/1997** पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. **JAL./123/2018-2020** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)